# पालक शिक्षक संघ, इचलकरंजी

बारावी सायन्स (PCB) ची परीक्षा देणारे विद्यार्थी व त्यांचे पालक बंधू-भगिनींना,

बारावीनंतर मेडिकल मध्ये प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना NEET ही प्रवेश परीक्षा द्यावी लागते. ही परीक्षा मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात असते. या परीक्षेचा पूर्वानुभव मिळावा या उद्देशाने **पालक शिक्षक संघ, इचलकरंजी** यांचे वतीने **शनिवार दि. १९ एप्रिल** रोजी सराव परीक्षा (Mock-Test) चे आयोजन करण्यात आले आहे. NEET परीक्षेचे स्वरूप काय असेल याविषयी विद्यार्थ्यांना पूर्वानुभव मिळावा या उद्देशाने पालक शिक्षक संघ, इचलकरंजीने हा **उपक्रम** हाती घेतला आहे. प्रतिवर्षी या सराव परीक्षेचा लाभ **१५००** पेक्षा अधिक विद्यार्थी घेतात. Mock-Test वेळी NTA ने आखून दिलेल्या SOP प्रमाणे सर्व प्रोटोकॉल पाळला जातो. परीक्षा हॉलमध्ये जातानाच विद्यार्थ्यांनी ड्रेस कोडचे पालन केले आहे ना? हे पाहिले जाते. ज्यांचा ड्रेस NEET परीक्षेकरिता अयोग्य आहे, त्यांना सूचना दिल्या जातात. परीक्षेवेळी ज्या गोष्टी सोबत आणणे आवश्यक आहेत त्या विद्यार्थ्याबरोबर आहेत ना? हे पाहिले जाते. तसेच ज्या गोष्टी परीक्षा केंद्रामध्ये घेऊन जायला परवानगी नाही, त्या बाहेरच ठेवाव्या लागतात. सराव परीक्षेवेळीच हा **अनुभव** मिळाल्याने प्रत्यक्ष NEET परीक्षेवेळी विद्यार्थ्यांची मानसिकता सकारात्मक राहते. या सराव परीक्षेच्या प्रश्नपत्रिका **अनुभवी** व **तज्ञ** प्राध्यापकांनी तयार केल्या आहेत. सराव परीक्षेच्या अनुभवाने विद्यार्थ्यांना पेपर सोडविताना वेळेचे नियोजन कसे करावे याचाही चांगला अंदाज येतो. या Mock-Test वेळी, नवीन जागा, नवीन सुपरवायझर यांचाही अनुभव आल्याने NEET परीक्षेला सामोरे जाताना आत्मविश्वास मिळतो.

पालक शिक्षक संघ, इचलकरंजीच्या वतीने ही परीक्षा NEET परीक्षेच्या आधी पंधरा दिवस, **शनिवार दि. १९ एप्रिल २०२५** रोजी **दुपारी १:३० ते ४:३०** या वेळेत घेण्यात येणार आहे. परीक्षेनंतर सर्व विद्यार्थ्यांना Answers Sheet आणि Hints and Solutions दिल्या जातात, त्यांना मिळालेले मार्क्सही कळविले जातात. या परीक्षेमुळे विद्यार्थ्यांना चुका समजतात व प्रत्यक्ष NEET परीक्षेवेळी विद्यार्थ्यांच्या गुणात **लक्षणीय वाढ** झाल्याचे आढळून येते.

मेडिकल प्रवेश इच्छुक विद्यार्थी, विद्यार्थिनींनी या Mock Test चा लाभ घ्यावा. विद्यार्थ्यांनी या Mock Test चे फॉर्म दि. **१२ एप्रिल** पर्यंत भरणे आवश्यक आहे. हे फॉर्म्स इचलकरंजी मधील सर्व ज्युनिअर कॉलेजेस मध्ये तसेच पुढे दिलेल्या ठिकाणीही उपलब्ध आहेत.

| | | |
|---|---|---|
| उमेशचंद राठी,<br>किरण गॅस गोडाऊन समोर | अशोक मेडिकल लॅब,<br>डॉ लांडे हॉस्पिटल समोर (सुंदर बाग) | प्रकाश भागाजे,<br>आदिनाथ सोसायटी |

---

## पालक शिक्षक संघ, इचलकरंजी

## ॲडमिट कार्ड

NEET 2025 सराव परीक्षा ( Mock Test) **सहभाग फॉर्म- प्रवेश पत्र**

**शनिवार दि. 19 एप्रिल 2025** रोजी दुपारी **1:30 ते सायंकाळी 4:30** पर्यंत

परीक्षा केंद्र :- **मुसळे हायस्कूल , बिग बाजार जवळ, सांगली रोड, इचलकरंजी**

विद्यार्थी पूर्ण नाव :- ------------------------------------------------------------

पत्ता :- ------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

मोबाईल नंबर :- ------------------------------ पालक मोबाईल नंबर :- ------------------------------

कॉलेज/ अकॅडमीचे नाव :- ------------------------------------------------------------

विद्यार्थी सही :- ----------------------------------------

**SEAT NO.**

| 2 | 0 | 2 | 5 | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

संचालक ( Mock Test)

पालक शिक्षक संघ इचलकरंजी